साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

※ परळी वैजनाथ ※ सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ ※ पाने-४ ※ २/-₹ www.parliparisar.com



दिवाळीनिमित्त सर्व वाचक, जाहिरातदार, वर्गणीदारांना

हार्दिक शुभेच्छा!

- संपादक

## परळी ते मुंबई अमृत भारत एक्सप्रेस सुरू करा-आ.धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- परळी वैजनाथ ते मुंबई विशेष अमृत भारत एक्सप्रेस गाडी सुरू करावी तसेच लातूर ते मुंबई जाणाऱ्या लातूर एक्सप्रेसचा आठवड्यातून किमान चार दिवस परळी मार्गे नांदेड पर्यंत पल्ला वाढविण्यात यावा, परळी वैद्यनाथ ते नाशिक विशेष ज्योतिर्लिंग एक्सप्रेस गाडी सुरू करण्यात यावी यांसह विविध मागण्या माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केल्या आहेत. परळी रेल्वे स्थानकावर भाविकांना माहिती देण्यासाठी विशेष माहिती केंद्र सुरू करावे त्याचबरोबर नांदेड पनवेल एक्सप्रेस गाडीला फर्स्ट क्लास एसी चे



ड बे वाढवून द्यावेत, ा रेल्वे नकावर ीटी लाईनला जुरी देण्यात ावी यांसह वेविध मागण्या या पत्राद्वारे धनंजय मुंडे यांनी केल्या आहेत.

परळी वैजनाथ हे रेल्वे विभागाला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवून देणारे रेल्वे स्थानक असून पुणे आणि मुंबईसाठी नियमित ये-जा करणारे अनेक प्रवासी, तसेच वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी येणारे व जाणारे लाखो भाविक परळी रेल्वे स्थानकातून प्रवास करतात. मात्र परळी वरून थेट मुंबईला जाण्यासाठी रेल्वे गाडी उपलब्ध नसल्याने ही मागणी करण्यात आल्याची समजते. त्याचबरोबर परळी वैद्यनाथ येथून नाशिककडे जाताना औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांना जोडणारी ज्योतिर्लिंग एक्सप्रेस ही विशेष गाडी सुरू करण्याची ही मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे. गणेशोत्सव दिवाळी त्याचबरोबर महाशिवरात्री अशा विविध क्षणोत्सवांच्या काळामध्ये विशेष फेस्टिवल एक्सप्रेस देखील सुरू करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे. **

## ०७ नोव्हेंबरला सिरसाळ्यात कृषीकुल येथे शेतकरी संवाद मेळावा


### कृषीमंत्री श्री चौहान उपस्थित राहणार

परळी वैजनाथ (बातमीदार):- ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, माराठवाड्यातील शेतकरी बांधवांना केंद्रीय कृषीमंत्री संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याचेही संयोजकांच्या वतीने कळवण्यात आले आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदरील कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, राज्याच्या पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कृषीकुल हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून या वास्तूची उभारणी करण्यात आलेली असून, येथे मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांना आधुनिक शाश्वत शेतीचे परिपूर्ण प्रशिक्षण मोफत दिले जाते. जागतिक दर्जाच्या या प्रशिक्षण केंद्राला केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान भेट देणार आहेत. यानिमित्ताने शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून, हजारो शेतकरी कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात केंद्रीय कृषीमंत्री उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करणार आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्याकडून शेतकऱ्यांच्या समस्या, शेती - मातीच्या गरजा, पुरपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना तसेच शेती विकासाच्या नव्या दिशा उपस्थित मान्यवरांसमोर ठेवण्यात येणार आहेत. **




## दिवाळीच्या सणाला परळीत उत्साहात सुरूवात

परळी वैजनाथ (बातमीदार):- प्रकाशाचा, आनंदाचा व उत्साहाचा सण म्हणून ओळख असलेल्या



दिवाळीच्या सणाला परळी शहरासह तालुक्यात उत्साहात सुरुवात झाली आहे.

विद्युत रोषणाईने बाजारपेठा झगमगत आहेत. घरोघरीही अनेक नागरिकांनी अशी विद्युत रोषणाई केली आहे. आकाश कंदील लावले आहेत. फटाक्यांची आतषबाजी केली जात आहे. यामुळे आसमंत उजळून निघाला आहे. बाजारात खरेदीसाठी आबालवृद्धांची गर्दी झाली आहे. सोन्या-चांदी, कपडे, फर्निचर, मोबाईल, इलेक्ट्रीक वस्तू, फराळाचे पदार्थ, फुले, पूजेचे साहित्य यांची दुकाने गर्दीने गच्च आहेत. मोठ्या गर्दीमुळे रस्त्यावरून पायी चालणेही अवघड झाले आहे. बाजारपेठेसह शहरात व तालुक्यात दिवाळीचा सर्वत्र उत्साह दिसतो आहे. बँकेला दोन दिवस सुट्टी असल्याने शनिवारी बँकेत मोठी गर्दी दिसून आली. रविवारी ही बाजारपेठा सुरू होत्या. रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने खरेदीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात बाहेर पडले होते. चार दिवस चालणाऱ्या या सणाला सर्वत्र उत्साहात परळीत सुरुवात झाली आहे. अनेक नव्या दुकानांचा शुभारंभ यानिमित्ताने होत आहे. दरम्यान दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने परळी येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढली आहे. शहरातील बसस्थानक व रेल्वे स्थानकावरही प्रवाशांची मोठी गर्दी दिसत आहे. ***

## दिवाळीचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, उत्साह, समृद्धीसह सौहार्द घेऊन येवो-उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई, (जि.मा.का.):- दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि ऐक्याचा सण आहे. हा सण प्रत्येकाच्या जीवनात नव्या आशा, नव्या संधी आणि समाधानाचा प्रकाश घेऊन येवो, अशा सदिच्छा व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.



उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणतात की, यंदा राज्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पूरस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांचे, शेतीचे तसेच पशुधनाचे अतोनात नुकसान झाले आहे. या संकट काळात आपल्या शेतकरी व पूरग्रस्त बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यांचे जीवन पुन्हा उजळविण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करुया. अतिवृष्टी व पूरबाधित बांधवांना मदत करून त्यांनाही दिवाळीच्या आनंदात सहभागी करून घेण्याची महाराष्ट्राची सामाजिक परंपरा कायम राखूया. दिवाळी म्हणजे फक्त दिव्यांचा उजेड नव्हे, तर मनातील अंधार दूर करण्याचा संकल्प आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय आणि अनिष्ट रुढी-प्रथांचा अंधार दूर करून विवेक, ज्ञान आणि प्रगतीचा प्रकाश आपल्या जीवनात आणूया. सामाजिक ऐक्य, बंधुता आणि सौहार्द यांची भावना दृढ करण्याचा हा सण आहे. राज्यातील सर्व नागरिकांनी प्रगती, विकास आणि सहकार्याच्या वाटेवर एकत्र चालावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

दिवाळीच्या या प्रकाशा सोबत आपल्या राज्यात शांतता, स्थैर्य आणि समृद्धीचा नवा अध्याय सुरु व्हावा, अशा सदिच्छा व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील सर्व जनतेला दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. **

## ८ व ९ नोव्हेंबरला परळीत महाराष्ट्र आशा व गटप्रवर्तक फेडरेशनचे राज्यस्तरीय अधिवेशन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र आशा व गटप्रवर्तक फेडरेशन (सिटू) चे राज्यस्तरीय अधिवेशन परळीत होणार आहे. ८ व ९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या अधिवेशनासाठी राज्यभरातील पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. बीड जिल्हा आशा व गटप्रवर्तक युनियन व संघटनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून या राज्यस्तरीय अधिवेशनाची जय्यत तयारी सुरु आहे.

महाराष्ट्र आशा व गटप्रवर्तक फेडरेशन (सिटू) ची बैठक पार पडली.बैठकीस सोलापूर, सातारा, सांगली, पुणे, कोल्हापूर, बीड, जालना, औरंगाबाद, नांदेड, मुंबई, वर्धा, अकोला, बुलढाणा, भंडारा, यवतमाळ, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील फेडरेशन चे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या बैठकीत फेडरेशन अधिवेशन तयारी बाबत आढावा घेण्यात आला.महाराष्ट्र आशा व गटप्रवर्तक फेडरेशन (सिटू) चे राज्यस्तरीय अधिवेशन ८ व ९ नोव्हेंबरला परळीत होणार आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनात जन सुरक्षा विधेयक रद्द करा, चार कामगार संहिता आणि १२ तासांचा कामाचा दिवस रद्द करा, सार्वजनिक आरोग्याचे खाजगीकरण थांबवा आणि आरोग्याच्या बजेट मध्ये वाढ करा,आशा व गटप्रवर्तकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, योजना कर्मचाऱ्यांची एकजूट कायम करा, आदी मागण्यांचे ठराव पारित करण्यात येणार आहेत.

परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय अधिवेशनासाठी फेडरेशनच्या एकूण सभासद संख्येनुसार ७५ सभासदांच्या मागे १ प्रतिनिधी याप्रमाणे २०० प्रतिनिधी निश्चित करण्यात आलेले असुन त्याप्रमाणे सातारा १२, नांदेड १०, सिंधुदुर्ग १२, सांगली ६, सोलापूर ४०, धुळे - नंदुरबार ५, नाशिक ५, कोल्हापूर १८, जळगाव २, औरंगाबाद ९, भंडारा २, जालना ४, पालघर ५, वर्धा ७, मुंबई ५, बुलढाणा १२, चंद्रपूर ५, नागपूर - ११, अमरावती ६, पुणे ४, बीड १५, नगर ४, यवतमाळ ४, अकोला ७ असे एकूण २१० राज्यस्तरीय प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनाला आशा वर्कर्स यूनियनच्या अखिल भारतीय सरचिटणीस मधुमीता बडोपाध्याय,सिटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी. एल. कराड,सिटू चे सरचिटणीस एम. एच. शेख, आशा वर्कर्स यूनियनच्या अध्यक्षा आनंदी आवघडे,आशा वर्कर्स यूनियनच्या सरचिटणीस पुष्पा पाटील,कोषध्यक्षा अर्चना घुगरे आदी फेडरेशनचे शिर्षस्थ नेतेगण उपस्थित राहणार आहेत. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी प्रवचन मंडप,वैद्यनाथ मंदिर ते मोंढा मैदान या मार्गावर रॅली निघणार आहे. त्यानंतर मोंढा मैदानावर जाहीर सभा होणार आहे. परळीत होणाऱ्या या राज्यस्तरीय अधिवेशनाची जय्यत तयारी सध्या करण्यात येत आहे अशी माहिती बीड जिल्हा सरचिटणीस किरण सावजी यांनी दिली आहे.परळीतील अधिवेशन यशस्वी व अविस्मरणीय करण्याठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन बीड जिल्हा आशा वर्कर्स व गटप्रवर्तक युनियनच्या वतीने करण्यात आले आहे. ****





## परळीच्या बाजारात ऐन दिवाळीत भाज्यांचे भाव कडाडले; सर्वसामान्यांचे मोठी गैरसोय

परळी वैजनाथ (बातमीदार):- ऐन दिवाळीत परळीच्या बाजारात भाजीपाल्याचे भाव आव्वाचे सव्वा झाल्याने सामान्यांची मोठी गैरसाय होत आहे.

गेल्या महिन्यात झालेला मुसळधार पाऊस त्यानंतर सतत पडत गेलेला जोरदार पाऊस या व इतर कारणामुळे भाजीपाल्याच्या उत्पादनाला फटका बसला आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसापासून परळीच्या बाजारात भाजीपाल्याची आवक घटली आहे. परिणामी भाज्याचे भाव दुप्पट ते तिप्पट झाले आहेत कोथिंबीरची ५० ग्रॅम ची जुडी दहा रुपयाला विकत आहे. मेथी, गवार, मिरची, दोडके, कारले, भोपळा या भाज्या तर वीस आणि तीस तीस रुपये पाव किलो या दराने विकल्या जात आहेत. भेंडी, कद्दू, पालक , चुका, वांगी, कोबी या भाज्यांचे भावही असेच आहेत. बटाटा, कांदा. लसूण यांचे भाव मात्र स्थिर व आवाक्यात आहेत. ऐन दिवाळीत परळीच्या बाजारात भाजाच्या किंमती वाढल्यो आहेत. त्यांचे भाव आव्वाचे सव्वा झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होते आहे. दरम्यान , पाऊस थांबल्यानंतर नवीन भाजीपाल्याची लागवड शेतकऱ्यांनी केली असून येत्या काही दिवसात नवा भाजीपाला बाजारात येईल, भाजीपाल्याची आवक वाढल्यानंतर परळीच्या बाजारात भाज्यांचे भाव उतरतील, असे विक्रेत्यांनी सांगितले.**

## बंजारा समाजातील महिलांचे सोमवारी परळीत आंदोलन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बंजारा समाजाला अनुसूचित जमाती डढ प्रवर्गातुन आरक्षण मिळावे या मागणीसाठी सोमवारी ता २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजता परळी येथे मुली व महिलांचा बंजारा समाजातील पारंपरिक पद्धतीने मेरा आंदोलन होणार आहे. बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात लाखोंचे मोर्चे काढण्यात आले. राज्यभरात वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलन सुरुच आहेत. बंजारा समाजात दिवाळीच्या दिवशी प्रत्येक तांड्यावर मुली मेरा मागतात. यावर्षी परळी तालुक्यातील मुली व महिला सरकारकडे मेरा आंदोलनाद्वारे आरक्षण मागणार आहेत. सोमवारी सायंकाळी ६ वाजता सेवालाल चौकातुन मेरा आंदोलनाची सुरुवात होणार आहे. सेवालाल चौक, नेहरु चौक, जिजामाता उद्यान पासुन राणी लक्ष्मीबाई टॉवर पर्यंत मुली व महिला पारंपरिक पद्धतीने मेरा आंदोलन करणार आहेत. या वेगळ्या आंदोलनात बंजारा समाजातील मुली व महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सकल बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.*

## चावीवाल्याने पळवले दहा लाखाचे दागिने

परळी वैजनाथ, (बातमीदार):- कपाटाचे लॉक दुरूस्त करण्यासाठी आलेल्या चावी वाल्याने दहा लाखाचे दागिने पळवल्याची घटना परळीत घडली.

या प्रकरणाची माहिती अशी की, शहरातील माणिकनगर भागातील पांडुरंग लोखंडे यांच्या घरी कपाटाचे लॉक बदलण्यासाठी आलेल्या चावी वाल्याने लॉक दुरूस्त करताना श्री लोखंडे यांची नजर चुकवून सुमारे दहा लाखाचे दागिने पळवले. या प्रकरणी श्री लोखंडे यांनी पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीस ताब्यात घेतले आहे. या घटनेचा गुन्हा शहर पोलिसात दाखल झाला आहे. **

संपादकीय...

# आली दिवाळी...!

✲ सुविचार ✲

**जो माणूस कष्टाला लाजत नाही,त्याला जगात यशस्वी होण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही...!**

दिवाळी सण म्हणजे नव्या उत्साहाने जगण्याला सामोरे जाण्याची प्रेरणा देणारा उत्सव. सकारात्मक उर्जेचे प्रतीक, काळ्याकुट्ट अंधाराला प्रकाशमय करणारा हा महाउत्सव. अमंगल, नकारात्मतेचा नाश करणारा दीपोत्सव! दिवाळी म्हणजे प्रकाश, चैतन्य, उत्साह, नात्यांची वीण घट्ट करणारा सण. म्हणूनच दिवाळ सणाच्या उत्साहाला कशाचीही तोड नाही. घरादारातील लहान, थोर, आबालवृद्धांना आनंद देणारा त्यांच्या जीवनात आनंद आणणारा हा महाउत्सव. दिवा, पणती, आकाश-कंदिलाच्या उजेडाने जीवन प्रवासातील अंधार दूर करून लखलखत्या प्रकाश वाटेवर आपल्याला घेऊन जाणाऱ्या या सणाचा थाटमाट काही औरच असतो. दिवाळीत शांतपणे तेवत असलेली इवलीशी पणती आपल्याला आतून उजळून टाकते. दिवाळ सण माणसा-माणसांत, त्यांच्या मनामनात सकारात्मकता, उत्साह पेरतो. आशा जागवतो.

आबालवृद्धांप्रमाणे निसर्गही दिवाळीच्या स्वागतासाठी नटलेला असतो. परतीच्या वाटेवरील पाऊस, हिरव्या शालुने नटलेली धरत्री. थंडीला झालेली सुरूवात. अशा मन प्रसन्न करणाऱ्या वातावरणात दिवाळी येते. विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी, रांगोळ्या, नाकाला भुरळ घालणारे खमंग, स्वादिष्ट कुरकुरीत व गोड फराळाचे पदार्थ. या पदार्थांचा घमघमाट तोंडाला पाणी आणतो. फराळावर ताव मारत दिवाळीत 'दिवाळी अंक' वाचले जातात. वाचनीय अंक संग्रही ठेवले जातात.

यंदा निसर्ग परळीसह परिसरावर कोपला आहे. पाऊस जोरदार झाल्याने शिवार पाणीदार झाले आहे. मुबलक पाऊस झाल्याने नदी, नाले, तलाव तुडुंब भरले आहेत. तीळ, मूग, उडीद ही खरिपाची पिके कुठे आली तर कुठे पावसाने घालवली आहेत. हीच गत कापूस, सोयाबीन, तुरीची झाली आहे.

जमिनीतील पुरेशा ओलाव्याने रब्बीचे क्षेत्र यंदा वाढणार आहे. रब्बी पेरणीच्या तयारीला शेतकरी लागला आहे. पण त्यास पावसाचा व्यत्यय येतो आहे. त्यामुळे या पेरण्या दिवाळीनंतरच होतात की काय असे वातावरण सध्या आहे. यंदा गुरांच्या चाऱ्याचा, पिण्याचा पाण्याचा प्रश्न असणार नाही. असे असले तरी सरत्या पावसाळ्यात झालेला पाऊस आपल्याबरोबरच महाराष्ट्रातल्या बहुतेक भागात शेती आणि शेतकरी उध्वस्त करून गेला आहे. यामुळे शेतकरी मोठ्या संकटात आहे. शेतकऱ्यांना मदत आणि मोठा आधार देण्याची आज गरज आहे. सरकारकडून मदतीची घोषणा झाली आहे. दिवाळीदरम्यान ही मदत मिळणे गरजेचे आहे.

जगात काही ठिकाणी सुरू असलेले युद्ध, संघर्षाचा फटका, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्यालाही बसतो आहे. 'सायबर क्राईम' ही नवी व झपाट्याने वाढणारी गुन्हेगारी आपल्यापुढे आव्हान उभे करते आहे. राज्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिकांच्या निवडणुकीची धामधूम सुरु झाली आहे. कार्यकर्ते, नेते कामाला लागले आहेत. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे अवघड केले आहे. मुद्रण व्यवसायालाही महागाईचा मोठा फटका बसला आहे. कागद, शाई, पेपरचे भाव गगणाला भिडले आहेत. प्रिंट मिडिया पुढे सोशल मिडियाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. एकूणच या परिस्थितीमुळे दिवसेंदिवस दिवाळी अंकाची संख्या कमी होत आहे. निघालेल्या अंकाची पृष्ठ संख्याही घटली आहे. किंमतीही वाढल्या आहेत. याही परिस्थितीत वाचनीय दिवाळी अंक बाजारात आले आहेत. त्याची खरेदी वाचकांकडून होत आहे. 'परळी परिसर'चे वाचक, हितचिंतक, जाहिरातदार, वर्गणीदार, विक्रेते, वितरक या सर्वांना दिवाळीच्या मनःपूर्वक लाख लाख शुभेच्छा..! ***

# सांस्कृतिक व पर्यावरणपूरक दिपावली साजरी करुया...

भगवान गोपाल श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध करून त्याच्या बंदीशाळेतल्या अनेक पिडीत कन्यांची मुक्तता केली अशी पौराणिक कथा असून तो हा दिवस. दुष्टांचा नाश आणि मुक्तीचा आनंद हे या दिवसामागचे आनंद साजरा करण्याचे कारण आहे. अश्विनातले शेवटचे दोन दिवस आणि कार्तिकाचे पहिले दोन दिवस अशी ही चार दिवसांची मुख्य दिवाळी. अश्विन वद्य अमावास्येला सायंकाळी घरोघरी, दुकानांत, सोन्या-चांदीच्या पेढ्यांत, कार्यालयांत लक्ष्मीपूजन केले जाते.

घरातलं सोनं-नाणं, रोकड यांची पूजा करतात. व्यापारी सर्व हिशेबाच्या वह्यांचे पूजन करतात. या धनलक्ष्मीच्या पूजनाबरोबरच त्या दिवशी आरोग्यलक्ष्मी (केरसुणी) हिचीही पूजा करतात. लक्ष्मीपूजनानंतर फटाक्यांची आतषबाजी करून आनंद साजरा केला जातो.

दिपावली पाडवा म्हणजे बलिप्रतिपदा साडेतीन मुहूर्तांतला एक मुहूर्त. या दिवशी अनेक नवे प्रकल्प सुरू केले जातात. पाडव्याच्या दिवशी पत्नी पतीला ओवाळते. पती पत्नीला पाडव्याची भेट म्हणून वस्तू, दागिना किंवा साडी भेट देतो. कार्तिक शुद्ध द्वितीयेलाच भाऊबीज असे म्हणतात. बहीण-भावाच्या उत्कट प्रेमाचा हा दिवस. दिवाळीच्या सणातला लहान मुला-मुलींचा आनंदाचा भाग म्हणजे आकाशकंदील तयार करणे, किल्ला करणे, त्यावर चित्रे मांडणे, सायंकाळी दारापुढे छान-छान रांगोळ्या काढणे आणि फटाके वाजविणे. दीपावली हा सण सर्वत्र आनंद व उत्साहाने साजरा होतो. परस्परांना भेटवस्तू, शुभेच्छापत्रे देऊन आनंद दिला-घेतला जातो. अज्ञानाचा नाश आणि ज्ञानाचा प्रकाश देणारी ही दिवाळी सर्वांनाच प्रिय आहे.

जो तो आपापल्या परीने ती साजरी करतो आणि आनंद लुटतो. दिवाळी म्हणजे अत्यंत आनंदी, सुखद. दीपावलीच्या अनेक सुखद आठवणी पुढे अनेक दिवस मनात रेंगाळत राहतात. युगानुयुगे चालत आलेल्या या सणाचे स्वरूप मात्र बदलत चालले आहे, हे सत्य नाकारता येणार नाही. हिंदू धर्मातील सण, उत्सव, व्रते यामागे शास्त्र आहे.

त्याचप्रमाणे वर्षाचे १२ महिन्यांत येणारे सण आणि त्या काळात असणारे ऋतुचक्र यांची सांगड घालून त्याचा मनुष्याला लाभ व्हावा, हा उदात्त हेतू यामागे आहे. प्रत्येक सणाचे शास्त्र समजून घेऊनच सण साजरे केले तर त्याचा लाभ होईल. दीपावली या शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील दोन शब्दांच्या उच्चाराने झाली. 'दीप' म्हणजे 'दिवा' आणि 'आवली' म्हणजेच 'ओळ'. याचा संपूर्ण अर्थ पाहिला तर दिव्यांची एका ओळीत



केलेली रचना अर्थात दिवाळी. चौदा वर्षांचा वनवास संपवून प्रभू श्रीराम अयोध्येला परत आले, त्या वेळी प्रजेने दीपोत्सव केला, अशी कथा आहे. यानुसार पूर्वापार हा सण साजरा केला जात आहे.

आकाशदीप लावण्यामागील शास्त्र त्रेतायुगात आकाशदीपाची संकल्पना जन्माला आली. प्रतिवर्षी दिवाळी हा सण आला, की घरोघरी आकाशदीप (आकाशकंदील) लावतात. आकाशदीप लावण्याची प्रथा ही पूर्वापार चालत आलेली आहे. या रूढी, परंपरा काळानुसार बदलत गेल्या आणि त्याचे असणारे महत्त्व कुठेतरी कमी होत आहे. पण, त्यामागची भावना, प्रेम हे बदलणाऱ्या स्वरूपातही काही प्रमाणात टिकून आहे. बऱ्याचदा लोकं आपण पर्यावरण जपले पाहिजे, सण-उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे भान राखले पाहिजे असे काय काय म्हणत असतात पण हीच लोकं स्वतः त्या दृष्टीने कृती करताना दिसून येत नाही.'लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः कोरडे पाषाण ' अशी त्यांची गत असते. मात्र याला माझे कुटुंब अगदी अपवाद आहे. शाळा आणि अर्थात आपले कुटुंब आपल्या जडणघडणीच्या काळात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. याच शाळेतून आणि कुटुंबातून विचारांचा प्रभाव आपल्यावर पडताना दिसतो. सुदैवाने याच जडणघडणीच्या काळात माझ्यावर पर्यावरणपूरक सण-उत्सव साजरे करण्याचा प्रभाव पडला. दिवाळी तर तुम्हा आम्हा सगळ्यांसाठीच आनंदाचे, उत्साहाचे, मांगल्याचे आणि चैतन्याचे क्षण आपल्या पोतडीत जमा करत असते. आमच्यासाठी या सर्व गोष्टींसोबत पर्यावरणाचे भान राखणारे क्षण सुद्धा पोतडीत साठवण करत आहे. वर उल्लेख केलेल्या गोष्टी आमच्या घरी दिवाळीत तर होतच असतात. यापलीकडे जाऊन गणेश उत्सवात स्वतः घडवलेला शाडू माती, तांबड्या मातीचा बाप्पा असेल किंवा रंगपंचमीत घरी तयार केलेले रंग किंवा पुस्तक वसा सारखा उपक्रम. समाधानाने भरलेल्या या आश्वासक चित्रातून पर्यावरण हित जपत केलेला प्रयत्न आणि कुटुंबाचा भक्कम आधारच नव्या बदलाची नांदी आहे असेच वाटते. आदर्श शिक्षण संस्था बीडचे सचिव तथा माजीमंत्री ना.जयदत्त आण्णा क्षीरसागर, युवानेते रोहीत भैय्या क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ राजा मचाले, योगेश पवार, एम.ए.राऊत सर यांनी वेळोवेळी सांस्कृतिक, पर्यावरणपूरक रक्षणाला प्रोत्साहन बळ देत निसर्गाचा हिरवा शालू जोपासण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. दिपावली सणाला सुरुवात होत असून प्रदूषण नियंत्रणासाठी आणी पर्यावरण रक्षणासाठी दक्ष रहावे. दिपावली निमित्त विद्यार्थी, पालक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, परिसरातील विविध महिला-पुरुष ग्रामस्थांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा......!!!

**- धनवंत नानासाहेब मस्के**
पाटोदा बेलखंडी-पाटोदा

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
✲ वर्ष ०९ ✲ अंक २४ ✲ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ ✲ किंमत : २ रू.




# नवीन प्राथमिक शाळेत आकाश कंदील बनविण्याच्या उपक्रमात दोनशेवर विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

परळी वैजनाथ (बातमीदार):- येथील ऊर्जा नगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक शाळेत दिवाळीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आकाश कंदील बनविण्याच्या उपक्रमात शाळेतील दोनशेवर विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सुंदर आकर्षक छान-छान आकाश कंदील बनवले.

या शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. काही विद्यार्थ्यांनी तर टाकाऊ वस्तू पासून सुंदर, आकर्षक आकाश कंदीलाची निर्मिती केली. विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले आकाश कंदील दिवाळीनिमित्त आपल्या घरी लावले आहेत. या उपक्रमात शाळेतील इयत्ता चौथीची विद्यार्थीनी आरोही काळे पहिली आली तर सृष्टी फड ही दुसरी व राजलक्ष्मी चाटे ही विद्यार्थिंनी तिसरी आली. याशिवाय सुयश देशमुख, समर्थ कुंभार, सोमनाथ चव्हाण, विश्वजीत फुलसुंदर, मिस्टी कांबळे, श्रीया दराडे, शरयू बिडगर, अनुष्का चक्रे, पायल गायकवाड, यशश्री जंगले, रणवीर हंगे, वैदवी चव्हाण, भक्ती गित्ते, आरोही शिंदे, गुंजन बलखंडे, निर्गुण जाधव, अधिरा कांबळे, स्वरा माने, अभिनव शेळके, सोनम घटमल, शिवम मुंडे, समृद्धी देशमुख, अनन्या माने, मोक्षदा पट्टणकुडे, धनश्री सुरवसे, शरयू केंद्रे, धनश्री घोडके आदी विद्यार्थ्यांचे आकाश कंदील उत्कृष्ट ठरले. यासाठी शाळेतील शिक्षिका सौ.आयोध्या सुरवसे, सौ.शुभांगी मुंडे यांनी परीक्षण केले. या उपक्रमाचे संयोजन जेष्ठ शिक्षक एल.आय.वाकडे यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकांनी परिश्रम घेतले. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, ज्येष्ठ शिक्षक श्री वाकडे, विनोद देशमुख, सौ.आर.आर.जाधव, सौ.निटुरे, सौ. देशमुख, भागवतराव मुंड, श्री चौरे, सौ.गंगणे, सौ.देवकर आदींनी केले आहे. ***

## दरवळणारा सुगंध...



**समाधानाने जगणं ठाऊक असणाऱ्यांना वागणं कसं असावं हा प्रश्न कधीच पडत नाही, जीवन जगण्याची कला फक्त त्यांनाच माहीत असते.. जे स्वतः सोबत दुसऱ्यांच्याही आनंदाचा मनापासून विचार करतात..!**

# सोमवार आणि मंगळवारी आ.मुंडे घेणार परळी नगर परिषदेतील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले असून, परळी वैजनाथ येथील नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून लढण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस मुलाखती घेणार आहेत. सोमवारी (ता.२०) सकाळी अकरा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत वॉर्ड क्रमांक एक ते आठ मधील इच्छुक उमेदवारांच्या तर उर्वरित वॉर्डातील इच्छुकांच्या मंगळवारी अकरा ते पाच या वेळेत मुलाखती घेणार आहेत. या सर्व मुलाखती परळी शहरातील नवीन विशेष शासकीय विश्रामगृह या ठिकाणी होणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित राहतील. दरम्यान मागील बऱ्याच वर्षांपासून ही नगर परिषद एकहाती धनंजय मुंडे यांच्या ताब्यात राहिलेली असून, गेल्या जवळपास चार वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहेत. **

**बचत विजेची समृद्धी राष्ट्राची !**

# खर सांगू मित्रा डोळे पाणावले...

पेन मध्ये शाई भरून घेण्यासाठी दुकानदाराच्या समोर रांग लावलेली आमची पिढी..दुकानदार ही शाईचे थेंब मोजुन पेन मध्ये टाकायचा.आधीच होल्डर उघडून ठेवायचे आणि रांगेत उभे रहायचे. कधी शाई हातावर सांडायची, ती तशीच डोक्याला पुसायची. कधी शर्ट खराब व्हायचा, तर कधी चड्डी.
या रांगेतूनच आमच्या पिढीला सहनशील बनवलं. तो शाई मिळाल्याचा आंनद भारीच होता.

शाळेत तर काही बोलायची सोयच नव्हती. कान धर, कोंबडा हो, बेंचवर उभे रहा, अंगठे धर, वर्गाबाहेर उभे रहा, अशा सगळ्या शिक्षा निमुटपणे हसत-खेळत सहन केल्या.. शिक्षकांच्या सपासप छड्या खाल्ल्या. यातुनही सहनशीलता वाढली. पण त्या शिक्षणाची गोडीपण न्यारीच होती. जुन्या कपड्यांची शिऊन घेतलेली दप्तरे वापरलेली आमची पिढी... दप्तरे म्हणजे तरी काय, तर कापडाची पिशवी. फार तर काय त्यालाच आतुन कम्पास ठेवण्यासाठी केलेला कप्पा..असं दप्तर आता पुन्हा भेटणे नाही, शाळेतून आल्यावर भिरकवायला मजा यायची! आणि आई खेळायला चाललो असं ओरडायलापण मजा यायची. वॉटर बॅग नावाचा प्रकार तर अस्तित्वातच नव्हता. सरळ जाऊन शाळेतील हौदाच्या नळाला तोंड लावून पाणी प्यायचे... हौद धुतलेला आहे का नाही, पाणी स्वच्छ आहे का नाही हा विचार मनात नसायचा. पण पूर्ण तहान भागायची, शर्ट वर करून किंवा शर्टच्या बाहीलाचं तोंड पुसायचं.

शाळेत पायीच जाणारी आमची पिढी. सायकल म्हणजे चैन असणारा तो काळ. सायकल असली तरी सारखी सारखी चेन पडणारा तो काळ. ती चेन बसवताना नाकी नऊ यायचे आणि हाता बरोबर तोंड ही काळे व्हायचे. काळे हात मातीने पुसायचे, लईच भारी.जुन्या सायकलच्या खरेदी विक्रीचे व्यवहार जोरात चालायचे. कुणाची सायकल विक्रीला आहे याचा शोध घेतला जायचा. दहा वेळेस भेटून, मध्यस्थ टाकून, घासाघीस करून मग किंमत ठरवली जायची. आधी मधुन हाफ पॅडल, मग हळु हळु टांग मारायची. मगच नंतर डबल सीट..दहावी पर्यंत सगळ्या वर्गाला पुढच्या वर्गातील हुशार मुलं माहिती असायची. चांगल्या स्थितीतील पुस्तके कुणाकडे सापडतील याचा दोन चार महिने आधीच शोध घेतला जायचा. ज्याच्याकडे पुस्तके असतील त्याच्या कडे चकरा मारल्या जायच्या आणि वशिला लावला जायचा. पुस्तके व्यवस्थितरित्या पाहिली जायची आणि मग त्यावर त्याची किंमत ठरवली जायची. शक्यतो निम्म्या किंमतीत व्यवहार ठरवला जायचा. पुस्तके मिळाली की स्वर्ग दोन बोटे उरायचा, कव्हर घालायला झिंग असायची. जुन्या वह्या सगळ्या जपुन ठेवल्या जायच्या. वह्या वापरताना ही जपूनच वापरल्या जायच्या. जास्तीत जास्त कोरी पाने ठेवली जायची. सगळी कोरी पाने वेगळी काढायची आणी मग ती एकत्र केली जायची. पुन्हा नव्याने एखादा प्रेसवाला शोधायचा आणि किंमतीची घासाघीस करून वह्या बाईंडिंग करून आणायच्या. त्यासाठी सतरा चकरा माराव्या लागायच्या. उद्या या, परवा या, अजुन झाल्या नाहीत, नंतर या, असं बरेच दिवस चालायचं. शेवटी एकदाच्या वह्या मिळाल्या की उड्या मारत घरी यायचं. एखादी वही पाहिजे असेल तर त्यासाठी आईकडून वशिला लावायचा. दहा वेळेस मागणी करावी लागायची. यातूनच नकार पचवायला शिकलो आणि सहनशीलताही वाढली. वर्षभरात कपड्यांचे दोनच जोड मिळायचे. त्यातला एक शाळेचा असायचा तर दुसऱ्यासाठी दिवाळीच्या सणाची वाट बघावी लागायची. तो पर्यंत ठिगळ लावलेले शर्ट, चड्ड्या वापराव्या लागायच्या. विशेष म्हणजे याचे कोणालाही काहीही वाटायचे नाही. दिवाळीचे कपडे मात्र जपून जपून वापरायचे. मागितलं की हजर असं कुणालाच काही मिळाले नाही.... यातूनच नकार स्वीकारण्याची सवय लागली. बरं त्या काळातील पालकांच्या मानसिकतेनुसार उच्च आर्थिक परिस्थितीतील घरातील पोरांनाही अशीच वागणूक होती. त्यात गरीब, श्रीमंत असा भेदभाव नव्हता.

**राहिल्या त्या आठवणी..!**

पोराचे सगळे मित्र माहिती असायचे, कुठे जातो, काय करतो यावर नजर असायची. चुकला की पहिले कानफटवले जायचे. उगाचच लई लाड नव्हते. कामापूरतेच कौतुक असायचे. त्यामुळे पोराचे पाय जमिनीवरच रहायचे.

मोठ्यांचा धाक होता, दडपण होते. मान सन्मान होता. पोरगं इकडं तिकडं दिसलं तर दहा जण विचारायचे, काय रे ? तु अमक्याचा ना ? इकडे काय करतोस? उलट उत्तरे देण्याची बिशाद नव्हती. भरपूर मार खाऊन झाल्यावर उपाशीच झोपावे लागायचे.. घरातीलच एखादी आज्जी, आत्या, मावशी गुपचूप ताट आणून प्रेमाने जेवण भरवायची. पोरगं मुसुमुसु रडत रडत, एका हाताने डोळे पुसत पुसत चार घास खायचं आणि तिच्याच कुशीत झोपायचं. दुसऱ्या दिवशी काल काय झालं हे विसरून पुन्हा आपल्या उद्योगाला लागायचं. आपण म्हणू तसेच होईल असे नाही हे पोराच्या लक्षात यायचे. त्याच्यात नकार पचवण्याची क्षमता आपोआपच निर्माण व्हायची. हे केले तर ते देईल अशी कुठलीही प्रलोभने नव्हती. ताटात जे वाढले ते गुपचूप खावे लागायचे. कोणतेही नखरे चालत नव्हते, नाहीतर उपाशीच झोपावे लागेल हे माहिती होते. जगणं लुटूपूटुचं नव्हतं, खरं खरं जगणं होतं, आभासी जग नव्हतं, जिवाभावाचे मित्र होते, अवास्तव अपेक्षा नव्हत्या. कोणती स्वप्नं पाहायची याच भान होतं.
पालकांनाही पोराचा वकुब माहिती असायचा, त्यामुळे त्यांच्याही अवास्तव अपेक्षा नसायच्या. काळ बदलला आणि सगळंच बदललं, पण जीवनाच्या कोऱ्या कागदावर उमटलेले ते शाईचे डाग मात्र अजूनही तसेच आहेत. ते काही पुसता म्हणता पुसले जात नाहीत. या निळ्या शाईने सहनशीलता दिली, उज्वल भवितव्य दिलं, लढण्याचं बळ दिलं. आत्महत्या हा विचार ही आमच्या पिढीच्या मनाला शिवला नाही. कारण आम्ही अपमान गिळायला वर्गातच शिकलो. शाळेतला अपमान हा समाजात मानसिक तोल संभाळायला शिकवून गेला. म्हणूनच आमची पिढी म्हणायची, 'कोरा कागद...निळी शाई...आम्ही कुणाला भीत नाही...!

***